
Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - III / Hindi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5** (www.sjifactor.com)

# २१. दहशतवाद : मानव निर्मित आपत्ती

**प्रा. कांबळे शिवाजी ईरबा**
इतिहास विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकर नगर ता. बिलोली जि. नांदेड.

**प्रस्तावना**

जागतिक पातळीवर मानवाला अनेक मानव निर्मित आपत्तीला तोंड द्यावे लागत आहे. मानव निर्मित नैसर्गिक आपत्तीमुळे सजिवांचे जगणे कठीण झाले आहे. नैसर्गिक आपत्तीबरोबरच मानव निर्मित दहशतवाद ही आपत्ती अतिशय विनाशकारी ठरत आहे. भारताच्या बाबतीत विचार केला तर दहशतवादामुळे वित्त व प्राणहानी मोठया प्रमाणात झाली आहे. जगात या मानव निर्मित दहशतवादाचा उदय केव्हा झाला ? याचा अभ्यास केला तर लक्षात येईल की याची बिजे मागच्या काळात रोवली गेली होती. भारतातील हिंदु–मुसलमानात वैमनस्याची भावना भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच झाली होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हिंदु–मुस्लिम यांच्यात दंगल होवून फार मोठया प्रमाणात रक्तपात झाला होता. स्वातंत्र्यानंतरही जम्मू काश्मीर, पंजाब, आणि भारतातील इतर ठिकाणी दहशतवाद्यांनी हिंसाचार घडवून आणला आहे. भारताची आर्थिक राजधानी मुंबई ही संवेदनशील बनली आहे. दहशतवादाचे गडद ढग केवळ भारतावरच नाही तर जगावर पसरलेले आहेत. जगात अनेक दहशतवादी संघटना स्थापना करण्यात आल्या. वरचेवर त्यात भर पडत आहे. लष्कर–ए–तोयबा, अल कायदा, इंडियन मुजाहिदीन, काश्मीर जिहाद फोर्स, जमात उद दवा, जम्म काश्मीर लिबरेशन फ्रंट, जम्मू काश्मीर नेशनल लिबरेशन आर्मी, बब्बर खालसा, पिपल्स वॉर ग्रुप इत्यादी दहशतवादी संघटना आहेत. भारतातील सामाजिक आर्थिक विषमतेमुळे नक्षलवादाचा उदय झाला. स्वतंत्र खलिस्तानसाठी पंजाबमये मोठया प्रमाणात हिंसाचार घडवून आणण्यात आला. काश्मीर तर आजही धगधगत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. दहशतवादाचा उदय का झाला ? याचा अभ्यास करणे
2. दहशतवादचा भारतावर काय परिणाम झाला ? याचा आढावा घेणे
3. पंजाबमधील भिंद्रनवालेच्या उदयाला कोण जबाबदार ? याचा अभ्यास करणे
4. ऑपरेशन ब्ल्यू स्टार योग्य होते की नाही याचा अभ्यास करणे
5. काश्मीरमधील दहशतवाद वरचेवर का वाढत चालला ? याचा आढावा घेणे
6. दहशतवाद संपवण्यासाठी उपाय सुचविणे

**दहशतवाद म्हणजे काय ?**

दहशतवादाची व्याख्या अनेकांनी केलेली आहे. त्यापैकी कांहीच्या व्याख्या पुढील प्रमाणे आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेने मे 2004 दहशतवादाची व्याख्या अशी केली की, 'दहशतवाद म्हणजे अशी कृती (हिंसक) की ज्यामुळे सशस्त्र संघर्षाचा घटक नसलेल्या सामान्य नागरिकांच्या जिवितास अपाय पोहचतो आणि शासन किंवा आंतरराष्ट्रीय संघटनेस एखादी कृती करण्यास अथवा न करण्यास त्यामार्फत भाग पाडण्याचा प्रयत्न केला जातो.' दहशतवादाची

व्याख्या करणाऱ्यापैकी जॉन क्रेटम हे एक आहेत. ते म्हणतात, 'आपल्या राजकीय मागण्या जबरदस्तीने मान्य करुन घेण्यासाठी विशिष्ट समुहात आंत्यतीक भीती निर्माण करण्याच्या हेतुने एखादी व्यक्ती किंवा गट यांनी प्रस्थापित सत्तेच्या बाजुने किंवा विरोधात चालविलेला हिंसाचार किंवा निर्माण केलेला धाक होय.'

**दहशतवादाचे स्वरुप**

दहशतवादाचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येते की त्याचे स्वरुप व्यापक आहे. एका व्यक्तिला मारा आणि हजारोंच्या मनात भिती निर्माण करा हे दहशतवाद्यांचे सूत्र आहे. दहशतवादी संघटनांनी आपापले जाळे जगभरात निर्माण केलेले आहे. ज्या त्या संघटनेतील सदस्यामध्ये संघटीतपणा आणि उद्देशासाठी मरण्याची तयारी आहे. कांही संघटनेमध्ये मतभेद निर्माण होवून फुट पडल्याचे दिसून येते. या दहशतवादी संघटणांनी नियोजनबध्द पध्दतीने हिंसाचार घडवून आणला आहे. राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक इत्यादी क्षेत्रावर आपला प्रभाव दहशतवादाने निर्माण केला आहे. आधुनिक शस्त्रांस्त्राच्या साहयाने मनवते विरुध्द कृत्ये करुन मानवी हक्कावर गदा आणली आहे. दहशतवाद्यांनी लोकशाहीचे तत्वे पायदळी तुडवून आपला विचार पुढे नेण्याचे काम केले.

**दहशतवादाच्या उदयाची कारणे**

दहशतवाद ही मानव निर्मित आपत्ती निर्माण होण्यामागची पार्श्वभूमी फार पूर्विची आहे. भारतामध्ये भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीपासून हिंदु–मुस्लिमांत दरी निर्माण होण्यास सुरु झाली होती. मुस्लिम लिगने स्वतंत्र पाकिस्तानसाठी लढा देत असताना हिंदु विरुध्द

हिंसात्मक मार्गाचा अवलंब केला होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हिंदु–मुसलमानात दंगली होवून रक्तपात झाला होता. भारतात काश्मीरचे विलिनीकरण होण्यास विलंब झाला होता. पाकिस्तानला काश्मीर हवे होते. पण ते भारतात विलीन झाल्यानंतर पाकिस्तानने तेथील फुटीरवाद्यांना मदत केली. पाकिस्तानातून दहशतवादी काश्मीरमध्ये आले आणि तेथे हिंसाचार घडून आला. आताही काश्मीरमधील दहशतवादाला खतपाणी घालण्याचे काम पाकिस्तान करीत आहे. भारतात दहशतवाद निर्माण होण्यामागे राजकीय, धार्मिक, सांस्कृतीक इत्यादी कारणे आहेत.

मुस्लिम राजकर्त्यांनी अनेक वर्षे भारतावर राज्य केले. त्यामुळे आपण राजकर्त्याची जमात आहोत ही मानसिकता मुस्लिमात आहे. कट्टर हिंदुत्ववाद्यांना भारत हिंदु राष्ट्र बनावे असे वाटते. राजकीय लाभ मिळविण्यासाठी वादग्रस्त बाबरी मस्जिद पाडण्यात आल्यानंतर भारतात अनेक ठिकाणी दहशतवाद्यांनी हिंसात्मक घटना घडवून आणल्या. इ.स. 1945 साली दुसरे महायुध्द संपल्यानंतर अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांचा उदय झाला. अमेरिका ही भांडवलशाहीवादी तर रशिया साम्यवादी विचाराचा. साम्यवाद आणि भांडवलशाही यांचे विळयाभोपळयाचे नाते आहे. रशियाने जगात साम्यवादाचा प्रसार करीत असताना अमेरिकेने रशियाच्या धोरणाला विरोध करुन भांडवलशाहीचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. यातून भांडवलशाहीचा राष्ट्रांचा गट विरुध्द साम्यवादी राष्ट्रांचा गट निर्माण होवून शीतयुध्द झाले. रशियाने आफगाणिस्तानात हस्तक्षेप करुन तेथे आपला प्रभाव निर्माण केला. अमेरिकेनेही आफगाणिस्तानात हस्तक्षेप करुन रशिया विरुध्द तेथील तालीबान्याला मदत केली. तिथे तालीबानचे वर्चस्व वाढत गेले. त्यातूनच रशिया समर्थक शासक नजिबुल्लाला संपविण्यात आले. आफगाणिस्तानात हस्तक्षेप करण्यासाठी नेहमी पाकिस्तानने आपल्या भूमिचा वापर करु दिला. त्या मोबदल्यास अमेरिकेने पाकिस्तानला मोठया प्रमाणात आर्थिक

मदत केली. अमेरिकेकडून मिळालेल्या आर्थिक मदतीचा उपयोग पाकिस्तानने भारताविरुध्द केला. भारतातील प्रामुख्याने काश्मीर मधील दहशतवाद्यांना मदत केली. तालीबान अमेरिकेच्या उरावर बसल्यानंतर अमेरिकेचे डोळे उघडले. पंजाबमध्ये आकाली दल आणि कॉग्रेस यांच्यात सत्तेसाठी नेहमी स्पर्धा असते. पंतप्रधान इंदिरा गांधीच्या काळात आकाली दलला शह देण्यासाठी कॉग्रेसने जर्नेलसिंग भिंद्रनवालेला पुढे केले. पुढे तो एवढा वरचढ झाला की तो कॉग्रेसचे ऐकेनासे झाला. जर्नेलसिंग भिंद्रनवालेचा उदय झाल्यानंतर त्याने पंजाबमध्ये हिंसाचार घडवून आणला. स्वतंत्र खलिस्तानची मागणी करण्यात आली. पण त्यास विरोध करण्यात आला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी श्रीलंकेत शांतता स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला होता पण ते श्रीलंकेतील तमीळीना आवडले नाही. भारतातील सामाजिक आणि आर्थिक विषमता नक्षलवादाच्या उदयास कारणीभूत ठरली. त्याच बरोबर बेरोजगारामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. वैफल्यग्रस्त काही तरुण नक्षलवाद व दहशतवादाकडे वळले. अशा विविध कारणांमुळे भारतातील दहशतवादाचा उदय झाला.

**दहशतवाद्यांकडुन रक्तपात**

मानव निर्मित दहशतवादी राक्षसाने अनेक निरापराध लोकांचा बळी घेतला. वेगवेगळया दहशतवादी संघटणांनी जगात अनेक ठिकाणी हिंसात्मक घटना घडवून आणला. काश्मीरमध्ये अनेक वर्षापासून दहशतवादाने थैमान घातले आहे. पाकिस्तानने काश्मीरमधील फुटिरवाद्यांना मदत करुन भारतात अशांतता निर्माण करण्याचे काम केले. उच्च पदस्थ व्यक्तींचे तसेच राजकीय व्यक्तीचे अपहरण करुन त्यांना ठार मारण्यात आले. भारताचं नंदनवन असलेले कश्मीर दहशतवादामुळे उध्वस्त झालेलं आहे. तेथे निरपराध लोक आणि लष्कर बळी जात आहे. पाकिस्तानच्या चिथावनीमुळे काश्मीर मधील परिस्थिती वरचेवर बिघडत आहे. पंजाबमध्ये स्वतंत्र खलिस्तानसाठी दहशतवाद्यांनी हिंसात्मक घटना घडवून आणला. भिंद्रनवाले आणि इतर दहशतवाद्यांनी अनेक निरापराध लोकांना मारले. जर्नेलसिंग भिंद्रनवालेचा जालंधर येथील हिंदी समाचार समुहाच्या वृत्तपत्रावर विशेष राग होता. या वृत्तपत्राचे संपादक लाला जगतनारायण यांची दहशतवाद्यांनी 9 सप्टेंबर 1981 रोजी गोळया घालून हत्या केली. सरकारने भिंद्रनवालेच्या बाबतीत कठोर भूमिका घेतली नाही. लाला जगतनारायण यांच्या हत्यासंदर्भात भिंद्रनवालेच्या विरोधात अटक वारंटही निघालं होतं. पण पोलीसांना हुलकावणी देवून गुरुद्वाऱ्यात आश्रय घेतला. भिंद्रनालेला अटक होवू नये म्हणून अनेक त्याच्या अनुयायांनी प्रयत्न केले. पुढे त्याने स्वतः ला अटक करुन घेतली. त्याच्या अटकेनंतर हिंदूची हत्या करण्यात केली. रेल्वे अपघात घडवून आणण्यात आले. दहशतवाद्यांनी एका भारताच्या विमानाचं अपहरण करुन पाकिस्तानात नेलं होतं. लाला जगतनारायण याच्या हत्येसंदर्भात जर्नेलसिंग भिंद्रनवाले जबाबदार आहे असा पुरावा नाही हे कारण पुढे करुन सरकारने त्याची सुटका केली. ही सुटका न्यायालयाने नाही तर तत्कालीन सरकारने केली. भिंद्रनवाले कडे उत्तम दर्जाचे वक्तृत्व होते. त्यामुळे तो तरुण वर्गात लोकप्रिय झाला होता.

पंजाबमधील परिस्थिती वरचेवर बिघडत चालली होती. कायदा व सुव्यवस्था ढासळलेला होता. अमृतसर येथील पवित्र सुवर्णमंदीरात जर्नेलसिंग भिंद्रनवाले आणि त्याचे अनुयायांनी आश्रय घेतला होता. ते बाहेर निघायला तयार नव्हते. शेवटी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 5 जुन 1984 रोजी ऑपरेशन ब्ल्यू स्टार ही कारवाई केली. त्यात जर्नेलसिंग भिंद्रनवाले मारला गेला. ऑपरेशन ब्ल्यू स्टार मुळे शिखांच्या मनात इंदिरा गांधीबद्दल द्वेषाची भावना निर्माण झाला. ऑपरेशन ब्ल्यू स्टार मुळे सुवर्ण मंदीराच्या पावित्र्याला धक्का लागला अशी शिखांची भावना

झाली. त्यातूनच 31 ऑक्टोबर 1984 साली त्यांच्या अंगरक्षकांनी त्यांची हत्या केली. जर्नेलसिंग भिंद्रनवालेचा निरंकारी पंथाला विरोध होता. त्यातूनच निरंकारी पंथाचे प्रमुख गुरुबचन सिंग यांची 24 एप्रिल 1980 साली हत्या करण्यात आली. अतिशय सुपिक असलेला पंजाब दहशतवादामुळे एकेकाळी रक्तरंजीत झाला होता. पंजाब व काश्मीरसह दहशतवाद्यांनी भारताच्या इतर ठिकाणीही हिंसक कृत्ये केली. मुंबई, पुणे, मालेगांव इत्यादी ठिकाणीही अशा हिंसक घटना घडल्या. इ.स. 1993 साली दहशतवाद्यांनी मुंबईत 12 साखळी बॉम्बस्फोट करुन 257 निरपराध लोकांचा बळी घेतला होता. तसेच 13 जुलै 2011 साली मुंबईत पुन्हा बॉम्बस्फोट होवून 19 लोक मृत्यू पावले होते. तमिल टायगर ऑफ तमिल इलम या दहशतवादी संघटनेने श्रीलंका आणि भारतात रक्तपात घडवून आणला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी श्रीलंकेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. लीटे नेता प्रभाकरण याला राजीव गांधीचे धोरण आवडले नाही. म्हणून लिटेकडून 21 मे 1989 रोजी श्रीपेरंबदूर या ठिकाणी राजीव गांधीची हत्या केली. 26 नोंव्हेबर 2008 साली दहा पाकिस्तानी दहशतवाद्यांनी मुंबईवर हल्ला केला. 26 नोंव्हेबर ते 28 नोंव्हेबर 2008 साली झालेल्या या हल्ल्यात 34 परेदशी नागरिकासह कमित कमी 197 लोक ठार झाले. पाकिस्तानातून आलेल्या या दहशतवाद्यांनी भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबइवर आठ ठिकाणी हल्ले केले होते. छत्रपती शिवाजी टर्मिनस, हॉटेल ताज महाल पॅलेस अँड टॉवर, नरिमन हाऊस, मेट्रो सिनेमा आणि टाईम्स ऑफ इंडिया इमारतीच्या मागील एक गल्ली या ठिकाणी दहशतवाद्यांनी हल्ले केले होते. या हल्ल्यातील दहशतवादी अजमल अमीर कसाब हा पोलीसांच्या तावडीत जिवंत सापडला. 13 फेब्रुवारी 2010 साली दहशतवाद्यांनी पुण्यातील बेकरीच्या दुकानात बॉम्बस्फोट केला. या हल्ल्यात नऊ लोक मारले गेले तर 60 पेक्षा जास्त लोक जखमी झाले. अमेरिका, अफगाणिस्तान, पाकिस्तान इत्यादी देशातही दहशतवाद्यांनी हिंसक कृत्ये केली. 11 सप्टेंबर 2001 साली दहशतवाद्यांनी अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेडवर हल्ला केल्यानंतर अमेरिकेचे डोळे उघडले आणि अमेरिकेने दहशतवादाच्या विरुध्द पाऊले उचलली.

## निष्कर्ष

दहशतवाद हे मानव निर्मित फार मोठे संकट आहे. मानवी प्रवृत्ती स्वार्थी आहे. धर्म ही अफुची गोळी आहे असे मावर्स म्हणाला होता. धर्मांधतेमुळे जगात अनेक प्रश्न निर्माण झालेत. आपल्या धर्माचा प्रसार व्हावा, आपल्या धर्माची सत्ता निर्माण व्हावी ही मानसिकता दहशतवाद्यांना आढळुन आली. परंतु काही प्रसंगी दहशतवाद्यांनी स्वतःच्या धर्मातील लोकांनाही मारण्याचे काम केलेले आहे. धर्मांधतेतूनच भारतात अनेक घटना घडून आल्या आहेत. धार्मीक करणाबरोबरच आर्थिक विषमता आणि सामाजिक विषमता यातून नक्षलवाद उदयाला येवून नक्षलवाद्यांनी कृत्ये चालूच आहेत.काश्मीर आणि पंजाब या ठिकाणच्या दहशतवादी घटना बघितल्या की या समस्येचे बदलते स्वरुप लक्षात येते. तसेच भारताच्या पूर्वेकडील राज्यातही अनेक हिंसक घटना घडलेल्या आहेत. भारताला दहशतवादातून बाहेर काढावयाचे असेल तर संकुचित राजकीय, धार्मिक व जातीय मानसिकता नष्ट करायला पाहिजे. जर्नेलसिंग भिंद्रनवालेचा उदय राजकीय कारणातून झाला होता. तशा चूका राजकीय पक्षांनी करता कामा नये. धर्म व जात या पेक्षा तरुणांना रोजगार मिळाला पाहिजे याकडे राजकीय पक्षाने लक्ष दिले पाहिजे. भारतीयांनी तर धर्मावर आधारित राजकारण न करता सर्वसमावेशक राजकारण केले पाहिजे. भारतीयांनी भारत माझा देश, भारत माझा धर्म आणि भारत माझी जात या भावनेने वागले पाहिजे. भारतातील फटिरवादी वृत्तीला आळा घातला पाहिजे.

संदर्भ ग्रंथ

1. फडके य.दी.– राजकीय दहशतवाद– अक्षर प्रकाशन, 7/8, पांडुरंग बिल्डींग, ल.ज.रोड, मांटुगा (प.) मुंबई – 400013
2. गोडबोले माधव, सुजाता गोडबोले (अनु.) – फाळणीचे – राजहंस प्रकाशन हत्याकांड 1025, सदाशिव रोड, पुणे–411030 (2013)
3. ब्रार के.एस. भगवान दातार (अनुवाद) – ऑपरेशन – रोहन प्रकाशन, धवलगिरी ब्ल्यू स्टार शॉप, 5 व 6, 430 शनिवार पेठ विर मारोतीसमोर पुणे–411030 (म–2014)
4. पुपुल जयकर, अशोक जैन (अनु.)–इंदिरा गांधी– राजहंस प्रकाशन, 1025, सदाशिव पेठ, पुणे–411030 (सप्टें. 2006)
5. रिबेरो जे.एफ.– बुलेट फॉर बुलेट– चिनार पब्लीशर्स, 11 ए. ओम गुरुदत्त हाउसिंग सोसायटी चव्हाण नगर, धनकवाडी, पुणे–411030, (मे 2001)
6. उदगावकर म.न.–अदृष्य भस्मासूर दहशतवाद– प्रमोद प्रकाशन, ठकार वाडा ब्राम्हण गल्ली, सासवड, जि.पुणे–411030, (1990)
7. गोखले शरच्चंद्र–झुंज दहशतवादाशी :एक अभ्यास–चिनार प्रकाशन, 11 ए, ओम गुरुदत्त चव्हाणनगर, धनकवाडी, पुणे–411030 (15 जाने 2005)
8. गावंडे देवेंद्र–नक्षलवादाचे आव्हान– साधना प्रकाशन, 431, शनिवार पेठ, पुणे–411030 (2 ऑक्टो. 2012)
9. गुल इम्तियाज, देशपांडे रेखा (अनु.)–अलकायदाचे– अक्षर प्रकाशन, धागेदोरे जरिवाला बिल्डींग, नं. 1 ए विंग रुम नं. 7 टी.एच.कटारीय मार्ग माहिम, मुंबई–400016 (जून 2011)